महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे Rs.2/- कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

शनिवार ❖ ०५ एप्रिल २०२५ ❖ वर्ष ६ ❖ अंक २७७ ❖ पाने – ४ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# आता गाळ, माती, मुरूम, दगड मिळणार विनामूल्य

दैनिक जीवनदीप वार्ता

मुंबई : मातोश्री ग्रामसमृद्धी पाणंद रस्ते योजना मंजूर करण्यात आली आहे. घरकुल लाभार्थी आणि शासकीय बांधकामांसाठी राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मोठी घोषणा केली आहे. शेततळी, पाझर तलाव, महसूली नाले आणि बंधाऱ्यांमधून निघणारा गाळ, माती, मुरूम आणि दगड आता विनामूल्य मिळणार आहे. यामुळे आता शेतापर्यंत कृषी यंत्रसामग्री वाहतूक सहज शक्य होणार असून याबाबत महसूल विभागाने शासन निर्णय जारी केला आहे. गावागावात पाणंद रस्ते अत्यंत महत्त्वाचे असतात. मात्र, अनेक ठिकाणी पाणंद रस्त्यांची अवस्था खराब असून, त्यामुळे शेतकऱ्यांना शेतीत जाण्यास अडचणी येतात. याच पार्श्वभूमीवर सरकारने 'मातोश्री ग्रामसमृद्धी पाणंद रस्ते योजना' प्रभावीपणे राबवण्याचा निर्णय घेतला आहे. आता गाळ, माती,



## चंद्रशेखर बावनकुळेंनी केली घोषणा

मुरूम, दगड मिळणार विनामूल्य ! याशिवाय राज्यातील शेतकरी, घरकुल लाभार्थी आणि शासकीय बांधकामांसाठी शेततळी, पाझर तलाव, महसूली नाले आणि बंधाऱ्यांमधून निघणारा गाळ, माती, मुरूम आणि दगड विनामूल्य मिळणार आहे. या निर्णयामुळे शेतरस्ते सुधारण्यासाठी लागणारा मुरूम आणि माती शेतकऱ्यांना सहज उपलब्ध होईल, ज्यामुळे शेतीला जोडणारे रस्ते मजबूत होणार असल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे. महाराष्ट्र दिनापासून 'एक राज्य एक नोंदणी' दरम्यान, महाराष्ट्रात येत्या महाराष्ट्र दिनापासून म्हणजे 1 मेपासून ऑनलाईन मुद्रांक नोंदणी व 'एक राज्य एक नोंदणी' उपक्रम राबवण्याची घोषणा राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे. या उपक्रमामुळे पुण्यात बसून नागपुरातील घराची किंवा मुंबईत बसून पुण्यातील घराची नोंदणी नोंदणी करता येईल. ही सर्व प्रक्रिया फेसलेस असेल, असे बावनकुळे यांनी म्हटले आहे. सद्यस्थितीत घराच्या नोंदणीसाठी आपल्याला उपनिबंधक कार्यालयात किंवा तहसील कार्यालयात खेटे मारावे लागतात. अनेकदा या प्रकरणी नागरिकांचा मोठा वेळ व पैसे वाया जातात. या पार्श्वभूमीवर चंद्रशेखर बावनकुळे यांनी 1 मेपासून राज्यात एक राज्य एक नोंदणी धोरण राबवण्याची घोषणा केली आहे.

# रेल्वेमार्ग प्रकल्पाला ग्रीन सिग्नल

## ४८१९ कोटी रुपयांची तरतूद



दैनिक जीवनदीप वार्ता

4 एप्रिल 2025 रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय मंत्रिमंडळाची एक महत्त्वाची बैठक संपन्न झाली. शुक्रवारी झालेल्या या बैठकीत देशातील एकूण चार महत्त्वाच्या रेल्वे प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली.

देशातील एकूण 18658 कोटी रुपयांच्या चार मल्टीट्रॅकिंग रेल्वे प्रकल्पांना केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली असून यामध्ये महाराष्ट्रातील एका महत्त्वाकांक्षी रेल्वे प्रकल्पाचा समावेश आहे. या प्रकल्पांमुळे महाराष्ट्र, ओडिशा आणि छत्तीसगड या राज्यांतील रेल्वे कनेक्टिव्हिटीला चांगले बळ मिळणार आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने घेतलेल्या या निर्णयामुळे या संबंधित तिन्ही राज्यांमधील जवळपास 15 हून अधिक जिल्ह्यांना प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरीत्या फायदा होणार आहे. या निर्णयामुळे भारताचे रेल्वे नेटवर्क जवळपास साडेबाराशे किलोमीटर ने वाढणार असल्याचा अंदाज आहे. दरम्यान आता आपण केंद्रीय मंत्रिमंडळाने महाराष्ट्रातील कोणत्या रेल्वे मार्ग प्रकल्पाला मंजुरी दिलेली आहे आणि यासाठी किती निधीची तरतूद करण्यात आली आहे याच संदर्भात माहिती पाहणार आहोत. महाराष्ट्रातील या रेल्वेमार्ग प्रकल्पाचे काम होणार जलद आजच्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत महाराष्ट्रातील गोंदिया-बल्हारशाह रेल्वे मार्गाच्या 240 किमी लांबीच्या दुहेरीकरण प्रकल्पाला मंजुरी देण्यात आली असून यासाठी 4819 कोटी रुपयांची तरतूद करून देण्यात आली आहे. दरम्यान राज्यातील हा एक महत्त्वाकांक्षी रेल्वे मार्ग प्रकल्प असून या प्रकल्पामुळे विदर्भातील विकासाला चालना मिळणार आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यास या भागातील रेल्वे वाहतूक क्षमता वाढेल, पर्यटनाला चालना मिळेल आणि अर्थव्यवस्थेला मदत होईल अशी आशा जाणकारांकडून व्यक्त करण्यात आली आहे. तसेच, या रेल्वे मार्ग प्रकल्पामुळे उत्तर आणि दक्षिण भारतातील प्रवासी तसेच मालवाहतूक अधिक सुकर होणार आहे. छत्तीसगडबाबत बोलायचं झालं तर तेथील 615 किमी लांबीच्या नवीन रेल्वे मार्गासाठी सरकारकडून 8741 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. शिवाय, ओडिशामध्ये 3917 कोटी रुपयांचा खर्च करून 277 किलोमीटर लांबीचा एक रेल्वे प्रकल्प उभा राहणार आहे. यात संबलपूर आणि जरापाडा दरम्यान तिसरा आणि चौथा मार्ग जोडला जाणार आहे. तसेच, झारसुगुडा-ससोन दरम्यानही तिसऱ्या आणि चौथ्या मार्गाची जोडणी केली जाणार आहे. दरम्यान केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिलेल्या या चारही प्रकल्पांमुळे रेल्वेच्या पायाभूत सुविधा अधिक सक्षम होतील आणि वाहतूक व्यवस्था सुधारेल असा विश्वास व्यक्त होतोय.

# डुप्लिकेट ओबिसींचा बंदोबस्त करा

## जातनिहाय जनगणना मार्गी लावा

### राष्ट्रीय ओबीसी महासंघाने घेतली लोकसभा ओबीसी समितीची भेट

दैनिक जीवनदीप वार्ता

शहापूर : शासकीय भरतीमधील ओबीसिंच्या रिक्त जागा लवकरात लवकर भराव्यात तसेच २ लाख ९६ हजार रिक्त जागा असून काही डुप्लिकेट ओबीसींनी या जागा व्यापलेल्या आहेत.त्यासाठी समितीमध्ये एक उपसमिती नेमून अशा डुप्लिकेट ओबीसींचा शोध लावून ओबीसी विद्यार्थ्यांवर व कर्मचाऱ्यांवर होणारा अन्याय दूर करावा या व अशा विविध मागण्यासंदर्भात लोकसभा ओबीसी समितीचे चेअरमन गणेश सिंग यांची राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष बबनराव तायवाडे यांच्यासह महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष डॉ.प्रकाश भांगरथ, सचिव डॉ.सुरेश कापरे, वसंतराव भेरे,सचिन राजूरकर,प्रकाश साबळे आदि पदाधिका-यांनी श्री. सिंग यांच्या



दिल्ली येथील संसदीय कार्यालयात भेट घेऊन मागण्यांचे निवेदन सादर केले.

राष्ट्रीय ओबीसी महासंघ सातत्याने ओबीसी जातनिहाय सर्वेक्षण करण्याबाबत पाठपुरावा करीत आहे.परंतु अजूनपर्यंत हे सर्व्हेक्षण सुरू करण्यात आलेले नाही. तसेच ओबीसी मंत्रालय स्थापित करणे,क्रिमीलेयरची मर्यादा वीस लाखापर्यंत वाढविणे,स्थानिक स्वराज्य संस्थामधील आरक्षण वाढवणे, २४३ टी व २४३ डी अंतर्गत ओबीसींच्या शासकीय भरती मधील रिक्त जागा लवकरात लवकर भरणे, २४३ टी व २४३ डी अंतर्गत ओबीसींना आरक्षण देणे, याबरोबर ओबीसी विद्यार्थ्यांसाठी स्कॉलरशिप, ओबीसीं विद्यार्थ्यांसाठी होस्टेल, लोकसभा व विधानसभा मतदारसंघात ओबीसिंसाठी आरक्षित मतदारसंघ तयार करणे व डी लिमिटेशन कमिशनमध्ये त्याचा समावेश करुन लागू करणे आदि मागण्यांचे निवेदन ओबीसी आयोगाचे चेअरमन गणेश सिंग यांना देण्यात आले.दरम्यान ओबीसी विद्यार्थ्यांनी अत्यंत जागृत राहणे अत्यंत आवश्यक आहे.ओबीसीची कोणतीही मागणी जोपर्यंत पूर्ण होत नाही तो पर्यंत ती मागणी सरकारकडे करत रहावी लागते, सरकारला ओबीसी समाजाने निवडून दिले असेल पण ओबीसींच्या समस्याकडे कडे लक्ष दिले नाही तर ओबीसी महासंघाला राज्यव्यापी आंदोलन करावेच लागेल असे डॉ. प्रकाश भांगरथ यांनी प्रस्तुत प्रतिनिधिशी बोलतांना सांगितले.

> **ओबीसिंच्या संदर्भात अनेक मागण्यांचे निवेदन आयोगाचे चेअरमन गणेश सिंग व ओबीसी आयोगाचे चेअरमन हंसराज अहिर यांची भेट घेऊन त्या लागू करण्यासंदर्भात विनंती करण्यात आली. तसेच ही बाब ओबीसी समितीच्या वतीने पंतप्रधानांपर्यंत पोहोचवून कार्यवाही व्हावी याकरता ही भेट होती.**
>
> **– डॉ. प्रकाश भांगरथ, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष राष्ट्रीय ओबीसी महासंघ.**

# शहापूर येथील भू-प्रणाम केंद्राचे दूरदृश्यप्रणालीद्वारे उद्घाटन संपन्न

दैनिक जीवनदीप वार्ता

ठाणे : महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते दूरदृश्यप्रणालीद्वारे राज्यातील 30 भू-प्रणाम केंद्राचे उद्घाटन आज संपन्न झाले. यामध्ये उप अधीक्षक भूमी अभिलेख, ठाणे आणि उप अधीक्षक भूमी अभिलेख, शहापूर या कार्यालयातील भू-प्रणाम केंद्राचे उद्घाटनही संपन्न झाले.



यावेळी ठाणे कार्यालयात आमदार नरेंद्र मेहता, उपसंचालक भूमी अभिलेख कोकण प्रदेश महेश इंगळे, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख बाबासाहेब रेडेकर, उपअधीक्षक भूमी अभिलेख सिद्धेश्वर घुले, महेश भापकर, कार्यालयातील इतर अधिकारी-कर्मचारी, नागरीक व लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी उपसंचालक, कोकण प्रदेश मुंबई भूमी अभिलेख महेश इंगळे म्हणाले की, ठाणे येथील उप प्रादेशिक कार्यालयातर्फे भू-प्रणाम केंद्र म्हणजे जसे जिल्हाधिकारी कार्यालयात सेतूच्या धर्तीवर भूमी अभिलेख कार्यालयातील जे अभिलेख सुरु केले आहेत. टप्प्याटप्प्याने इतर तालुक्यातही ही केंद्रे सुरु करण्यात येईल. भू-प्रणाम केंद्रामध्ये जे ऑनलाईन सुविधा आहेत. मूळात हा विभाग अभिलेख जतन करतो, संधारण करतो आणि तयार करतो. ते जनतेला सुलभपणे तात्काळ उपलब्ध होण्याकरिता मुळात आमचे संकेतस्थळ आहे ती अपडेट असून त्यावर रेकॉर्ड आहे. पूर्वी जी मागणी असायची जुन्या रेकॉर्डची असायची. परंतू या कामासाठी बराच वेळ लागायचा. परंतू आता भू-प्रणाम या सुविधामुळे तत्काळ मोजणी सुरु झाली आहे. नागरिकांना जर रेकॉर्डविषयक माहिती घ्यावयाची असेल तर शासनाने ठरविलेल्या माफक दरात ही सेवा भू-प्रणाम केंद्रात उपलब्ध होणार आहे. यासाठी कोणत्याही मध्यस्थीची गरज नाही. मोजणीचे अर्ज करणे, वारस नोंदणीचे अर्ज करणे, खरेदीचे मोजणीचे अर्ज करणे, अशा वेळी येथे येवून माफक दरात अर्ज करु शकतात आणि त्यानंतर ही प्रक्रिया सुरु होईल. या भू-प्रणाम केंद्रामध्ये येथील कर्मचारी मदत करतील व काही अडचण असेल तर मुख्य लिपिक मदत करतील.जनतेला सोयीसुविधा कमी वेळेत दररोज नकला उपलब्ध होऊन तात्काळ मिळेल. या नकला डिजिटाईज्ड असणार आहेत. त्या घरबसल्या मिळू शकतात. ज्या लोकांकडे संगणक नाही त्यांना या सुविधा पाहिजे असेल तर यासाठी त्यांनी या ठिकाणी आल्यास त्यांना मार्गदर्शन करुन तात्काळ सेवा देण्याचे काम केले जाईल. व्हर्जन 2 आणि व्हर्जन 2.0 व व्हर्जन 1 यामध्ये काय फरक आहे तर व्हर्जन 1 मध्ये अर्ज करावा लागत होता. परंतू व्हर्जन 2.0 मध्ये घरबसल्या अर्ज करु शकतात. अर्जदारास किंवा खातेदारास कार्यालयात येण्याची आवश्यकता नाही. सर्व सेवा माहिती सर्व्हेमार्फत ऑनलाईन मिळते. याचा लाभ ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, शेतकरी खातेदारास होईल. तसेच हा उपक्रम सुरु असताना आलेल्या लाभार्थीनी या भू-प्रणाम योजनेच्या ऑनलाईन पत्रव्यवहाराची सुविधाही देण्यात आली आहे.

### भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रात दोन ठिकाणी

# 'कचरा मुक्त क्षेत्र' घोषित होणार

### – प्रशासक तथा आयुक्त अनमोल सागर

दैनिक जीवनदीप वार्ता

भिवंडी : मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या १०० दिवसांच्या कृती आराखडा कार्यक्रम अंतर्गत भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका प्रशासक तथा आयुक्त अनमोल सागर यांनी दिलेल्या निर्देशानुसार महापालिका कार्यक्षेत्रात घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत दोन ठिकाणी 'कचरा मुक्त क्षेत्र' (नो वेस्ट झोन) हा नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहे.

'कचरा मुक्त क्षेत्र' (नो वेस्ट झोन) नाविन्यपूर्ण उपक्रम अंतर्गत मनपा कार्यक्षेत्रातील:-

१. स्व. धर्मवीर आनंद दिघे चौक ते भिवंडी बस स्थानक पर्यंत (मुख्य रस्ता)

२. ओसवाल वाडी गेट ते मनपा शाळा क्र. ४२ पर्यंत (मुख्य रस्ता)

हि दोन ठिकाणे निवडण्यात आली आहेत. सदर 'कचरा मुक्त क्षेत्र' (नो वेस्ट झोन) नाविन्यपूर्ण उपक्रम अंतर्गत निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्रात घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत

पुढीलप्रमाणे कामे करण्यात येत आहेतः-



* ट्वीन लिटर बिन्स बसविणे.
* सदर क्षेत्राची व त्या अंतर्गत येणाऱ्या रस्त्यांची दोन सत्रात संपूर्ण स्वच्छता करणे.
* स्वच्छ भारत अभियान जनजागृती व सुशोभीकरणा करणे कामो सदर क्षेत्रातील भिंतींवर बोलकी चित्रे व घोषवाक्यांची रंगरंगोटी करणे.

तसेच निश्चित केलेल्या क्षेत्रात 'कचरा मुक्त क्षेत्र' नाविन्यपूर्ण उपक्रम पूर्णत्वास नेणे करिता बांधकाम व विद्युत विभाग यांच्या सहकार्याने अनुक्रमे 'कचरा मुक्त क्षेत्र' घोषित केल्याचे नामनिर्देशित लोखंडी फलक बसविणे आणि पथदिवे सुस्थितीत व चालू ठेवणे हि कामे करण्यात येत आहेत.


प्रशासक तथा आयुक्त अनमोल सागर यांच्या मार्गदर्शनाखाली सदर नाविन्यपूर्ण उपक्रम अंमलबजावणी करणे कामी आरोग्य विभागातील उपआयुक्त शैलेश दोंदे, सहाय्यक आयुक्त नितीन पाटील व आरोग्य अधिकारी हरेष भंडारे यांचे विशेष प्रयत्न सुरु असून संपूर्ण कामे पूर्ण करून मनपा कार्यक्षेत्रातील दोन ठिकाणे 'कचरा मुक्त क्षेत्र' (नो वेस्ट झोन) घोषित करण्यात येणार असल्याचे प्रशासक तथा आयुक्त अनमोल सागर यांनी सांगितले.

# एसटीचे जाहिरात उत्पन्न १०० कोटींपर्यंत वाढवा

### – प्रताप सरनाईकांचे निर्देश

दैनिक जीवनदीप वार्ता

एसटी महामंडळाच्या बसेस तसेच स्थानकांवर करण्यात येणाऱ्या जाहिरातींसाठी सर्वंकष नवीन धोरण तयार करून त्यामाध्यमातून मिळणारे उत्पन्न १०० कोटी रुपयांपर्यंत वाढवावे अशा निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले. तसेच राज्यभरात परिवहन विभागाच्या जिथे जिथे जमिनी आहेत, त्या बहुतेक जमिनीवर अतिक्रमण झाले आहे. ते अतिक्रमण काढून टाकून, तेथे कुंपण भिंत घालावी, तसेच नामफलक लावण्यात यावा. असेही प्रताप सरनाईक यांनी म्हटले आहे. परिवहन आयुक्त कार्यालयात बोलावलेल्या परिवहन विभागाच्या आढावा बैठकीमध्ये प्रताप सरनाईक बोलत होते. सध्या ज्या जाहिरात संस्थांना काम दिले आहे, त्यांच्याकडून अपेक्षित उत्पन्न मिळत नसल्याने त्यांचे करार रद्द करावेत, अशा सूचना देऊन मंत्री सरनाईक म्हणाले की, चांगले उत्पन्न देणाऱ्या संस्थांची निवड करावी. सध्या जाहिरातीच्या माध्यमतून महामंडळाला २२-२४ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळत आहे. त्यामध्ये वाढ करुन हे उत्पन्न १०० कोटी करण्याच्या दृष्टीने नियोजन करावे. नवीन बस खरेदीमध्ये प्रवासी व बस यांची सुरक्षा लक्षात घेऊन जाहिरातीसाठी उपयुक्त पॅनेल बसवण्याची व्यवस्था करावी. तसेच जुन्या बसेसमध्येही याची व्यवस्था करण्यात यावी. बसस्थानके सुधारण्यासाठी नियोजन करावे. बसस्थानकावर सुसज्ज महिला प्रसाधनगृहे उभारण्यात यावीत. राज्यातील महत्त्वाच्या बसस्थानकांवर महिलांसाठी स्वच्छतागृहे, हिरकणी



कक्ष उभारून ते चांगल्या स्थितीत राहतील याची व्यवस्था निर्माण करावी. एसटी महामंडळ मोठ्या प्रमाणावर डिझेल खरेदी करते. यासाठीच्या भविष्यात निविदा काढताना त्यामध्ये सीएसआर फंड संबंधित संस्थेने एसटीसाठी खर्च करावा, अशी अट समाविष्ट करावी, अशा सूचना मंत्री सरनाईक यांनी दिल्या. भाडेतत्त्वावरील इलेक्ट्रिक बस पुरवणाऱ्या संस्थेचा करार रद्द करा करारानुसार ५१५० इलेक्ट्रिक बस पैकी केवळ २२० बसेस एसटी महामंडळाला संबंधित संस्थेने भाडेतत्त्वावर पुरविल्या आहेत. भाडेतत्त्वावर इलेक्ट्रिक बस पुरवठा करण्याचा करार केलेल्या आणि अद्यापही बस पुरवठा न करणाऱ्या संबंधित संस्थेला अंतिम नोटीस पाठवावी. त्यानंतरही सकारात्मक प्रतिसाद न मिळाल्यास त्यांचा करार रद्द करण्याची कार्यवाही करावी. यंदा २ हजार ६४० लालपरी बसेस एसटीच्या ताफ्यात दाखल होणार आहेत. त्यापैकी मार्च अखेर ८०० बसेस १०० आगारात दाखल झाल्या असून, प्रवासी सेवेत रुजू झालेल्या आहेत. पुढील दोन महिन्यांत सर्व २५१ आगारांना नवीन बसेस मिळतील, असे नियोजन करावे. महामंडळाच्या नवीन बसेसचे लोकांनी चांगले स्वागत केले आहे. येथून सर्व बसेसमध्ये जीपीएस सह सीसीटीव्ही कॅमेराही बसवण्यात यावेत, असे मंत्री सरनाईक यांनी यावेळी सांगितले. अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घ्यावी.राज्यभरात ठिकठिकाणी परिवहन विभागाची जमीन आहे. त्या जमिनीवर कित्येक वर्षापासून अनधिकृत अतिक्रमण झालेले दिसून येते. याबाबत स्थानिक अधिकाऱ्यांनी सर्वेक्षण करून सदर जमिनी अतिक्रमण मुक्त करुन आपल्या ताब्यात घ्याव्यात. तेथे कुंपण भिंत करावी तसेच आपल्या विभागाचा नाम फलक प्रदर्शित करावा व यापुढे त्या ठिकाणी अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच सन २०२३ पासून परिवहन विभागाच्या विविध पदांच्या बदल्या या ऑनलाइन पद्धतीने होत आहेत. यामध्ये मानवी हस्तक्षेपाला कोणती संधी नाही. यापुढे या ॲपमध्ये आवश्यक त्या सुधारणा करून होणाऱ्या बदल्या अत्यंत पारदर्शक होतील याबाबत दक्ष रहावे! तसेच अधिकाऱ्यांच्या बरोबरच लिपिक पदाच्या बदल्या या ॲपद्वारे होतील, असे निर्देश मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले.

# डी. डी. १० मराठी उपग्रह वाहिनीचे 'सह्याद्री' असे नामकरण झाले

## सह्याद्री वाहिनीचा इतिहास

२ ऑक्टोबर १९७२ साली मुंबई दूरदर्शनची स्थापना झाली आणि त्यावेळचे स्टेशन डायरेक्टर होते पी.व्ही. कृष्णमूर्ती. डीडी दिल्ली केंद्रानंतरचे दुसरे डीडी केंद्र म्हणजे डीडी मुंबई केंद्र. त्या काळात, दिल्ली केंद्र वेगवेगळ्या बातम्या आणि राजकीय/राष्ट्रीय पातळीवरचे कार्यक्रम यांचे प्रमुख स्थान मानले जायचे. पण मुंबई ही मनोरंजनाची खाण आहे. या बॉलीवुड नगरीची गैरहजेरी दूरदर्शनमध्ये होती, म्हणून मुंबई दूरदर्शन केंद्राचा शुभारंभकरण्यात आला आणि महाराष्ट्राच्या कानाकोपर्यात, घराघरात, डीडी सह्याद्री हे नाव पोचले. नवनव्या कल्पनांनी नटलेले कार्यक्रम सादर केले गेले जे अधिक चैतन्यशील आणि खिळवून ठेवणारे होते. या काळात मैलाचे दगड ठरतील असे अनेक कार्यक्रम सादर करण्यात आले. यात कार्यक्रम चालू असताना फोन करता येणारा असा पहिलाच 'हॅलो-डीडी' हा कार्यक्रम आहे. तसेच सिने सतरंगी आणि टॉप टेन हे कार्यक्रम आहेत. चित्रपट-आधारित कार्यक्रम आहेत. 'फूल खिले है गुलशन गुलशन' या कार्यक्रमात तबस्सुम सिनेकलाकारांच्या मुलाखती घेत असे. हा तुफान लोकप्रिय कार्यक्रम होता. डीडी मुंबई केंद्राने याचबरोबर गाजलेल्या मालिका, सिनेआधारित कार्यक्रम,, सांगीतिक कार्यक्रम, रिऍलिटी शोज, पाककला कार्यक्रम, बातम्या आणि चालू घडामोडी यांवरचे कार्यक्रम, माहितीपर कार्यक्रम, सार्वजनिक चर्चा असे विविध कार्यक्रम सादर केले. कृषि, शिक्षण, माहिती आणि मनोरंजन कार्यक्रम हा दूरदर्शनच्या डीएनएचा भागच आहे. बालिका शिक्षण,




स्त्री सबलीकरण, आरोग्य जाणीवजागृती, तरुणाईसाठी स्फूर्तिदायी कार्यक्रम आणि ग्रामीण भारतातील शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी डीडी सह्याद्री अनेक कार्यक्रमांची निर्मिती करत आली आहे. राष्ट्रीय वाहिनी आणि दूरदर्शनच्या हिंदी पट्ट्याच्या जाळ्यातील केंद्रे यावर प्रक्षेपित झालेले सर्व चित्रपट मुंबई केंद्र प्रक्षेपित करते. बायोस्कोप, रंगोली आणि चुलबुली फिल्मे, चटपटी गपशप यासारखे राष्ट्रीय वाहिनीवरील चित्रपट आधारित कार्यक्रम मुंबई केंद्र निर्माण करते आणि प्रक्षेपित करते. यंग तरंग, कृषि-दर्शन, आमची माती आमची माणसे, आस्वाद, सखी सह्याद्री, हॅलो डॉक्टर, स्वस्थ भारत, पटलं तर घ्या, क्रीडांगण, म्युझिक मस्ती गप्पा गाणे (एम 2 जी2) यासारखे मालिका आधारित कार्यक्रम, तसेच सह्याद्री अंताक्षरी, चिना घिन था, दम दमा दम, नाद भेद, आजचे दावेदार उद्याचे सुपरस्टार यासारखे विविध स्पर्धात्मक, रिऍलिटी शोज यासारख्या अनेकानेक कार्यक्रमांनी प्रेक्षकांचे वर्षानुवर्षे मनोरंजन तर केले आहेच, पण त्याचबरोबर महाराष्ट्राच्या संपन्न संस्कृतीचे आणि परंपरांचे जागरणही केले आहे. तरी पण इतर चॅनलच्या भाऊगर्दीत सहाद्री चॅनेल कठेतरी कमी पडत आहे असे दिसते.

# वीड टू वेल्थ' या प्रकल्पामार्फत जलपर्णी पासून तयार करणार शोभेच्या वस्तू

दैनिक जीवनदीप वार्ता

कल्याण : उल्हास नदीतील प्रदुषण कमी करण्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी नुकतीच म्हारळ, वरप, कांबा येथे भेट देऊन उल्हास नदीतील जलपर्णीची पाहणी केली. यावेळी उल्हासनदीची व्यापकता पाहता तात्काळ कार्यवाही करण्यासाठी जलपर्णीबाबत ग्रामपंचायतींनी प्रस्ताव पाठवावे ते प्रस्ताव शासनास पाठविण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी मार्गदर्शन केले. तसेच वाढलेली जलपर्णी काढून त्यापासून शोभेच्या वस्तू बनविण्याचे जिल्हा परिषद प्रशासनाने निश्चित केले आहे. यासाठी महिला बचत गटांच्या माध्यमातून शोभेच्या वस्तू बनविण्याचे कामकाज करण्यासाठी विषेश प्रशिक्षण देऊन




**जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी केली उल्हासनदीची पाहणी**

कामकाज करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेमार्फत देण्यात आली.

वीड टू वेल्थ हा प्रकल्प आम्ही सुरू करणार आहोत. याअंतर्गत वीड म्हणजेच जलपर्णी ही नदीतून काढून त्या सुकवून त्यांचे रूपांतर शोभेच्या वस्तूंमध्ये केले जाईल. यासाठी महिला बचत गटांना प्रशिक्षित करून हे काम दिले जाईल. या शोभेच्या वस्तू विकून महिला बचत गटांना उत्पन्न मिळेल.

उल्हास नदीपात्रातील जलपर्णी पाहता काम व्यापक व खर्चिक असल्यामुळे याबाबत प्रस्ताव पाठविण्याच्या सूचना ग्रामपंचायतीना देण्यात आल्या. या भेटी दरम्यान अंबरनाथ पंचायत समिती ला मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी भेट देऊन १०० दिवस कृती कार्यक्रमांतर्गत सुरू असलेल्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. तसेच म्हारळ, वरप ग्रामपंचायत येथिल सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पाची सध्यस्थिती व जागेच्या नियोजनाबाबत चर्चा करण्यात आली. ग्रामपंचायत कांबा येथिल घनकचरा व्यवस्थापन जागेची पहाणी करून मार्गदर्शन केले.


यावेळी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र) अविनाश फडतरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा. पं) प्रमोद काळे, कल्याण चे तहसीलदार सचिन शेजाळ, कल्याण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संजय भोये, म्हारळ ग्रामपंचायतीच्या सरपंच निलिमा म्हात्रे, ग्रामपंचायत अधिकारी अमोल मुरबाडे, तसेच संबधीत अधिकारी व कर्मचारी आदी उपस्थित होते.

# समाजसेविका संगीताताई घोलप महिलाभूषण पुरस्काराने सन्मानित

## राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्रजी पवार यांच्या हस्ते प्रदान

दैनिक जीवनदीप वार्ता

मुरबाड : कल्याण तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते श्री कमलाकर घोलप यांच्या धर्मपत्नी समाजसेविका सौ सांगिता कमलाकर घोलप यांनी केलेल्या सामाजिक कार्याची दखल घेत मंत्रालय वार्ताचे संपादक अनिल आहिरे आणि निशा ताई भगत यांनी यशवंतराव चव्हाण सभागृह मंत्रालय मुंबई येथे,देशाचे आश्वासक नेतृत्व, माजी कृषिमंत्री, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रमुख राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या शुभस्ते राज्यस्तरीय महिलाभूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या शानदार सोहळ्याचे अध्यक्ष स्थान माजी मंत्री आणि सध्याचे विद्यमान खासदार चंद्रकांतजी हंडोरे यांनी भूषविले.यावेळी विचार पिठावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रवक्ता महेश तपासे, महागायक विष्णू शिंदे,रिपाई नेते अण्णासाहेब रोकडे, डॉ अश्विनी कांबळे उपस्थित होते.मुरबाड कल्याण तालुक्यातील गोर गरीब गरजू शोषित, पीडित अन्यायग्रस्त माणसाला न्याय मिळवून देण्याचे काम



सौ संगीताताई घोलप यांनी केले आहे. सध्या त्या कल्याण घोलपनगर येथील महिला मंडळाच्या अध्यक्षा म्हणून काम करतात. आतापर्यंत त्यांनी गरजू महिलांचे अनेक प्रश्न सोडवण्याचे काम केले आहे. त्यांनी कोविड काळात सेनीटायझर, मास, रुग्णाना लागणारी मदत, जीवाची पर्वा न करता केली. शासनाच्या लाडकी बहीण योजनेचे फॉर्म भरून देण्याचे काम करुन महिलांचा आशीर्वाद यांना लाभला आहे. यामुळे त्यांची महिला वर्गात एक प्रामाणिक समाजसेविका म्हणून ओळख निर्माण केली आहे.या त्यांच्या कार्याची दखल घेत,मंत्रालय वार्ताचा मानाचा राज्यस्तरीय महिलाभूषण पुरस्कार देऊन मान्यवरांच्या शुभ हस्ते सन्मानित करण्यात आले. सौ संगीताताई घोलप यांच्या निवडीने,कल्याण, मुरबाड बदलापूर, ठाणे,मधुन सामाजिक राजकीय, शैक्षणिक धार्मिक क्षेत्रात काम करणाऱ्या मित्र मैत्रीनी व राजकीय पुढारी कार्यकर्ते महिला यांनी अभिनंदनाचा वर्षाव करुन पुढील आयुष्या साठी आणि वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत..

# ४० वर्षाच्या सोनेरी आठवणीतील स्नेहमेळावा

दैनिक जीवनदीप वार्ता ठाणे

कल्याण : दहावीतील १९८५ ग्रुपचा स्नेहमेळावा चिरनेर हायवे येथील गजानन फोफेरकर यांच्या समर्थ कृपा या निवासस्थानी बुधवार दिनांक २ एप्रिल रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाले.यावेळी मित्र मैत्रिणी यांनी आणलेले द्राक्षे ,खजूर, फरसाण सर्वांनी आवडीने खाल्ले. यावेळी शालेय आठवणीना उजाळा देण्यात आला.४० वर्षापूर्वीच्या सोनेरी आठवणीत ..भूतकाळात सर्व दंग झाले होते.मैदानावर खेळलेले कबड्डी, खो.. खो , शाळेतील निरोप समारंभ बोर्डाची परीक्षा, निकालाची धाकधुक शाळेतील गोड आठवणीना उजाळा देऊन गप्पांची छानशी मैफिल रंगली होती.उपस्थित महिला भगिनीचे हळदीकुंकू झाले. यावेळी गजानन फोफेरकर यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यानंतर ग्रुपमधील हास्यसम्राट संजय मोकल याने सर्वांना पोट धरून हसवले. या ग्रुपमधील अनेक जण उच्चपदस्थ आहेत.मात्र मित्रमैत्रिणी यांच्याबरोबर



एकत्र येताना सर्वजण समानच असतात.इथे ना कोणी मोठा आणि ना कुणी लहान.

ग्रुपमधील आचारी दिपक म्हात्रे, विजय पाटील, प्रकाश फोफेरकर यांनी बनविलेले स्वादिष्ट, रुचकर आणि झणझणीत मटण आणि भाकरीवर सर्वांनी यथेच्छ ताव मारला.

वयाच्या ५५ वर्षी या जिगरबाज दोस्तांचा उत्साह पाहून उमर पचपन .. दिल बचपन या वाक्याची आठवण झाली.वयाची ५५ वी ओलांडलेले आणि आजीआजोबा झालेले अनेक जण या ग्रुप मध्ये आहेत.प्रत्येक सहलीत हिंदवी स्वराज्याचे संस्थापक आणि रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांचा किमान एक किल्ला हे मित्र पाहतात. आणि विशेष म्हणजे कोणताही किल्ला ते एका दमात चढून जातात.नियमित योगा, व्यायाम आणि योग्य आहार हे या मित्रांच्या फिटनेस चे रहस्य आहे. २०१८ साली व्हॉट्स ॲप च्या माध्यमातून या ग्रुपमधील मित्र मैत्रिणींस एकत्र आणण्याचे काम या ग्रुपचे ॲडमिन मिलिंद खारपाटील यांनी केले

यानंतर गेली काही वर्ष स्नेह मेळावा, ऐतिहासिक सहली, वृक्षारोपण आदींचे आयोजन करण्यात आले. या ग्रुपचा आदर्श समोर ठेवून चिरनेर परिसरातील अनेक ग्रुपचे स्नेह मेळावे झाले. आनंदाच्या क्षणाला जसे एकत्र येतात. तसेच एकमेकाच्या अडचणीला ,संकटात हे मित्र धाऊन जातात.

या स्नेह मेळाव्यासाठी मिलिंद खारपाटील, चंद्रहास म्हात्रे,पद्माकर फोफेरकर ,सूर्यकांत म्हात्रे, प्रकाश फोफेरकर, प्रकाश नारंगीकर, पंढरीनाथ नारंगीकर, सुभाष पाटील, बाळकृष्ण पाटील ,रोहिदास पाटील, हिरामण जोशी, राजेंद्र मुंबईकर,विजय पाटील ,उपकार ठाकूर,विजय मुंबईकर, गजानन फोफेरकर,संजय मोकल , दिपक म्हात्रे, चंद्रकांत गोंधळी, रोहिदास ठाकूर,विलास हातनोलकर, प्रमोद चिरनेरकर,रवींद्र पाटील, जगदीश घरत, जयवंत नाईक, प्रदेवी पाटील,मालती भगत, चंद्रप्रभा ठाकूर, मीना परदेशी, सुरेखा पाटील,सुवर्णा म्हात्रे असे २५विद्यार्थी आणि ६ विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

घरी परतताना सर्वांनी एकमेकांना साश्रू नयनांनी निरोप दिला.

या मित्रमैत्रिणींच्या मैत्री बद्दल असे म्हणावेसे वाटते की,ही दोस्ती तुटायची नाय!

# कल्याणातील कॅप्टन ओक हायस्कूलमध्ये शिव व्याख्यान संपन्न

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचाराने आणि आदर्शानेच पुढची पिढी घडेल - जयवर्धन नेवे यांचे प्रतिपादन

दैनिक जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याणच्या बालक मंदिर संस्थेच्या कॅप्टन रवींद्र माधव ओक हायस्कूलमध्ये शनिवार दि.१८मार्च २०२५ रोजी शिव व्याख्याते जयवर्धन दुर्गादास नेवे, जळगांव यांचे 'छत्रपती शिवाजी महाराज व आजचा युवक' या विषयावर शालेय विद्यार्थ्यांसाठी व्याख्यान आयोजित करण्यात आले. मोबाईलसारख्या सोशल मीडियाच्या वापरात गुरफटलेल्या विद्यार्थ्यांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार रुजावे व एक आदर्श पिढी घडावी,या हेतूने हे व्याख्यान शाळेतील कलाशिक्षक श्री. कैलास यादव सरोदे यांच्या संकल्पनेतून व सौजन्याने आयोजित करण्यात आले होते. शिव व्याख्याते जयवर्धन नेवे यांनी आपल्या व्याख्यानाला छत्रपती शिवाजी महाराज की जय! या जयघोषाने सुरुवात केली आणि यावेळेस संपूर्ण सभागृह दणाणून शिवमय होऊन अंगावर शहारे आले होते.

छत्रपती शिवाजी महाराज म्हणजे एक आदर्श आणि संस्कारांची खोल विहीर आहे. आपल्याला छत्रपती शिवाजी महाराज समजून घ्यायचे असतील , तर त्या विहिरीत तेवढेच खाली उतरावे लागते, असा उल्लेख त्यांनी केला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावरील काही निवडक गोष्टी त्यांनी विद्यार्थ्यांना सांगून त्यांच्यामध्ये प्रेरणा निर्माण केली. सोळाव्या वर्षी शिवाजी





महाराजांनी तोरणा किल्ला जिंकला आणि सोळाव्या वर्षीच स्वराज्याचं स्वप्न कसं बघितलं? हे समजावून सांगितलं! आणि अठरा पगड जाती,जमातीला व सवंगड्यांना सोबत घेऊन हिंदवी स्वराज्य कसं उभं केलं?हे आपल्या दमदार शैलीत मांडलं! पुढे त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांनी पन्नास वर्षाच्या अल्प आयुष्यात महाराष्ट्र उभा केला आणि छत्रपती शिवाजी महाराज अजून पुढे दहा वर्ष लाभले असते तर अजूनही आपला महाराष्ट्र मोठा बघायला मिळाला असता , असा उल्लेख त्यांनी केला. विद्यार्थ्यांनी शालेय जीवनात शिस्त पाळली पाहिजे आणि मोबाईल पासून दूर राहिले पाहिजे यातच तुमचं कल्याण आहे, असा मोलाचा सल्ला दिला. श्री. जयवर्धन नेवे यांनी शिवाजी महाराजांच्या अनेक घटना ,प्रसंगातून विद्यार्थ्यांमध्ये स्फूर्ती व प्रेरणा निर्माण केली. एक तासभर आपल्या दमदार व ओघवत्या भाषा शैलीने विद्यार्थ्यांना खिळवून ठेवले होते. अगदी अभ्यासपूर्ण व मुद्देसूद शिव व्याख्यानाचा आनंद विद्यार्थी व शिक्षकांना मिळाला. विद्यार्थी व शिक्षक यांना कायम लक्षात राहिल असे हे व्याख्यान होते.यावेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री. दिलीप तडवी, जळगाव जिल्ह्यातील लोहारा गावातील कृषिभूषण कृषिरत्न शेतकरी श्री. विश्वास आनंदराव पाटील हेदेखील आवर्जून उपस्थित होते. तसेच शाळेतील ज्येष्ठ शिक्षक श्री. उत्तम गायकवाड, श्री. रमाकांत सोनवणे, श्री. कैलास सरोदे व वर्गशिक्षक उपस्थित होते.

शाळेचे मुख्याध्यापक श्री. दिलीप तडवी यांनी जयवर्धन नेवे यांना सन्मानचिन्ह देऊन सन्मानित केले. संस्थेचे पदाधिकारी श्री. मयुरेश गद्रे, डॉ. सुश्रुत वैद्य, श्री. रमेश गोरे, श्री. प्रसाद मराठे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, शिक्षक-पालक संघातर्फे या उपक्रमाचे भरभरून कौतुक करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ शिक्षक श्री. उत्तम गायकवाड यांनी अप्रतिम असे केले.तर आभाराचे काम श्री. रमाकांत सोनवणे यांनी छान प्रकारे पार पाडले.

# वृद्ध महिलेचा बस खाली चिरडून मृत्यू

दैनिक जीवनदीप वार्ता

डोंबिवली : एका 70 वर्षीय वृद्ध महिलेचा रस्ता ओलांडताना शाळेच्या बसखाली आल्याने मृत्यू झाल्याची घटना शुक्रवार 4 तारखेला डोंबिवली पूर्वेकडील स्टेशनजवळील केळकर रोडवर घडली. याप्रकरणी बसचालकाविरोधात निष्काळजीपणाने वाहन चालवून महिलेच्या मृत्यूस कारणीभूत असल्याचा डोंबिवली रामनगर पोलीस




## बसचालकावर गुन्हा दाखल

ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून त्याला अटक करण्यात आली आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सुप्रिया अशोक मराठे असे अपघातात मृत्यू पावलेल्या वृद्ध महिलेचे नाव आहे. महिलेचा भाऊ सुधीर दत्तात्रय फडके यांच्या फिर्यादीवरून ओमकार इंटरनॅशनल शाळेची बस ( mh -05 Az0966) चालक दिंगबर मधुकर मिश्री याच्या विरोधात डोंबिवली रामनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.वृद्ध महिला कामानिमित्त घराबाहेर पडल्यानंतर केळकर रोडवर आल्या.रस्त्या ओलांडताना वृद्ध महिला शालेय बसखाली आल्या. केळकर रोडवरजवळील एका खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता काही वेळाने डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.रामनगर पोलिसांनी बसचालकाला अटक. केली असून पुढील तपास करत आहेत.

# गीतासार



**अध्याय ६**

**आत्मसंयमयोगः**

श्रीभगवानुवाच असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलम् । अभ्यासेन तु कौन्तेय वैराग्येण च गृह्यते ॥ ६-३५ ॥

भगवान श्रीकृष्ण म्हणाले, हे महाबाहो अर्जुना, मन चंचल आणि आवरण्यास कठीण आहे, यात शंका नाही. परंतु हे कुंतीपुत्र अर्जुना, हे मन अभ्यासाने आणि वैराग्याने ताब्यात येते. ॥ ६-३५ ॥

असंयतात्मना योगो दुष्प्राप इति मे मतिः । वश्यात्मना तु यतता शक्योऽवाप्तुमुपायतः ॥ ६-३६ ॥

ज्याने मनावर ताबा मिळविला नाही अशा पुरुषाला योग साधणे कठीण आहे आणि ज्याने मन ताब्यात ठेवले आहे अशा प्रयत्नशील पुरुषाला साधनेने तो प्राप्त होणे शक्य आहे, असे माझे मत आहे. ॥ ६-३६ ॥

अर्जुन उवाच अयतिः श्रद्धयोपेतो योगाच्चलितमानसः । अप्राप्य योगसंसिद्धिं कां गतिं कृष्ण गच्छति ॥ ६-३७ ॥

अर्जुन म्हणाला, हे श्रीकृष्णा, जो योगावर श्रद्धा ठेवणारा आहे; परंतु संयमी नसल्यामुळे ज्याचे मन अंतकाळी योगापासून विचलित झाले, असा साधक योगसिद्धीला म्हणजे भगवत्साक्षात्काराला प्राप्त न होता कोणत्या गतीला जातो? ॥ ६-३७ ॥

कच्चिन्नोभयविभ्रष्टश्छिन्नाभ्रमिव नश्यति । अप्रतिष्ठो महाबाहो विमूढो ब्रह्मणः पथि ॥ ६-३८ ॥

हे महाबाहो श्रीकृष्णा, भगवत्प्राप्तीच्या मार्गात मोहित झालेला व आश्रयरहित असलेला पुरुष छिन्न-विच्छिन्न ढगाप्रमाणे दोन्हीकडून भ्रष्ट होऊन नाश तर नाही ना पावत? ॥ ६-३८ ॥

## रेसिपी

# शेंगदाण्याची चटणी



**साहित्य**

शेंगदाणे - 1 वाटी
उडीद डाळ - 1 चमचा
चणाडाळ - 1 चमचा
कांदा - 1
टोमॅटो - अर्धी वाटी
लसणाच्या पाकळ्या - 3 ते 4
लाल तिखट -
पाणी
मोहरी
कढीपत्ता
तेल
मीठशेंगदाण्याची चटणी

**कृती**

सर्वात आधी पॅनमध्ये शेंगदाणे भाजून घ्यावेत. शेंगदाणे भाजल्यानंतर बाऊलमध्ये काढून घ्या.

पुन्हा त्याच पॅनमध्ये कढईत तेल टाकून त्यात मोहरी, कढीपत्ता, चणाडाळ चिरलेला कांदा, उडीद डाळ, हरभरा डाळ, टोमॅटो, लसणाच्या पाकळ्या घालून परतवून घ्यावेत.

आता भाजलेलं संपूर्ण मिश्रण आणि शेंगदाणे पाट्यावर किंवा मिक्सरमध्ये बारीक वाटून घ्यावेत. चवीपुरतं मीठ घालावे आणि संपूर्ण मिश्रण एकजीव करावे.

झटपट तयार होणारी शेंगदाण्याची चटणी तयार झाली आहे.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) — कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) — कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) — कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) — कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) — कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

# लव्ह जिहाद व धर्मांतरविरोधी कठोर कायदा करणार

दैनिक जीवनदीप वार्ता

छत्तीसगड राज्य सरकार हिंदू समाजाच्या सुरक्षेसाठी ठोस पावले उचलत आहे. राज्यात लव्ह जिहाद आणि बळजबरीच्या धर्मांतराला पूर्णतः आळा घालण्यासाठी कठोर येत्या अधिवेनात कायदा करण्याचा निर्णय मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी घेतला आहे. हिंदू जनजागृती समिती आणि हिंदुत्वनिष्ठ प्रतिनिधींशी झालेल्या विशेष बैठकीत मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले की, "छत्तीसगडमध्ये लव्ह जिहाद आणि धर्मांतर विरोधात भारतातील सर्वात प्रभावी कायदा



आम्ही आणत आहोत. येणाऱ्या अधिवेशनात हा कायदा संमत करण्यासाठी आमची पूर्ण तयारी झाली आहे."

हलाल सर्टिफिकेशन षडयंत्रावर सरकारची ठोस भूमिका

राज्यातील हलाल सर्टिफिकेशन हे एक आर्थिक षडयंत्र असून, त्याविरोधात कठोर कारवाई करण्यासाठी राज्य सरकार गंभीर आहे. यासंदर्भात लवकरच महत्त्वपूर्ण निर्णय घेतले जातील, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

**हिंदु जनजागृती समिती व हिंदुत्वनिष्ठ यांची छत्तीसगडचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्यासह बैठक**

बांगलादेशी व रोहिंग्या घुसखोरीवर कठोर कारवाई सुरू

## मुख्यमंत्री विष्णुदेव साय यांचे आश्वासन !

राज्यातील बांगलादेशी आणि रोहिंग्या घुसखोरीच्या समस्येवरही सरकारने कठोर भूमिका घेतली आहे."आतापर्यंत ८०० जणांची चौकशी करण्यात आली असून, काहींवर कारवाई झाली आहे. भविष्यातही अशा कारवाया सुरूच राहतील," असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

बैठकीसाठी उपस्थित हिंदुत्वनिष्ठ प्रतिनिधी या महत्त्वाच्या चर्चेसाठी हिंदू जनजागृती समितीचे साधक आणि इतर धर्मप्रेमी उपस्थित होते. समितीच्या वतीने महाराष्ट्र व छत्तीसगड राज्य संघटक श्री सुनील घनवट, श्री हेमंत कानसकर, श्री मंगेश खंगन आणि श्री निरज क्षीरसागर यांनी सहभाग घेतला. याशिवाय गोरक्षा सेवा दलाचे कार्यकर्ता श्री अंकित दिवेदी, हिंदुत्ववादी श्री प्रवेश तिवारी, लक्ष सनातन संघटनेचे संस्थापक श्री विशाल ताम्रकार, शिवसेना रायपूरचे जिल्हाध्यक्ष श्री आशिष परेडा आणि श्री प्रतीक रिजवानी हे देखील उपस्थित होते.

हिंदू समाजासाठी निर्णायक पावले उचलण्याचे आश्वासन

या बैठकीदरम्यान लव जिहाद विरोधी कायदा करावा, धर्मांतर विरोधी कायदा करावा, बांगलादेशी घुसखोरांच्या विरोधात कठोर कारवाई करावी आणि हलाल सर्टिफिकेटवर बंदी आणावी या मागण्यांचे निवेदन समितीच्या वतीने छत्तीसगडचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांना देण्यात आले. यावर त्यांनी वरील सर्व मुद्द्यांवर कठोर कायदे करण्याचे स्पष्ट आश्वासन दिले. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी हिंदू समाजाच्या सुरक्षेसाठी आणि सशक्तीकरणासाठी सरकार कटिबद्ध असल्याचे सांगितले. हिंदू धर्म, संस्कृती आणि परंपरांचे संरक्षण करण्यासाठी सरकार ठोस निर्णय घेईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# शिक्षण क्रांती संघटनेच्या प्रयत्नांना अखेर यश

## शिक्षकेतर पदभरतीचे प्रमाण निश्चित
## शिक्षकेतर नियुक्तीचा मार्ग मोकळा

दैनिक जीवनदीप वार्ता

दि.४ एप्रिल रोजी शासन निर्णय निर्गमित करून अनेक वर्षापासून रखडलेल्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकेतरांच्या नियुक्तीचा मार्ग मोकळा झाला आहे. शिक्षण क्रांती संघटनेचे राज्य अध्यक्ष सुधीर घागस यांचा यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू होता. या निर्णयामुळे खाजगी अनुदानित व अंशतः अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

वरीष्ठ लिपिक व मुख्य लिपिक ही पदे खाजगी शाळांच्या नियमावलीतील अनुसूचि ब अन्वये पदोन्नतीने भरता येतील तर कनिष्ठ लिपिक, पुर्णवेळ ग्रंथपाल व प्रयोगशाळा सहाय्यक ही पदे अनुशेषाचे पालन करून निकषाप्रमाणे ८० टक्के भरता येतील. कार्यरत चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांमधून पात्र असलेल्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती देता येणार आहे. अनुकंपाची भरती ३१ डिसेंबर २००२ च्या शासन आदेशानुसार पुर्वीप्रमाणेच सुरू राहील. शासनाच्या या निर्णयाने अनेक बेरोजगारांना रोजगार मिळणार असल्याने शिक्षण क्रांती संघटना या निर्णयाचे स्वागत करीत असल्याचे कोकण विभाग अध्यक्ष रमेश निवृत्ती जाधव यांनी सांगितले.

# बँकेतील व्यवहार मराठीतून करा

## कल्याणमधील बँक अधिकाऱ्यांना मनसेचे निवेदन

दैनिक जीवनदीप वार्ता

कल्याण : मुंबईत हिंदू नववर्ष गुढीपाडवा मेळाव्यात मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी राज्यात बँकेतील व्यवहार मराठीतूनच झालेच पाहिजेत असे फर्मान दिले होते. राज ठाकरे यांच्या आदेशानुसार कल्याणमधील मनसैनिकांनी शहरातील बँक अधिकाऱ्यांना या विषयाचे निवेदन दिले तसेच बँकेत मराठी बोलण्याचे स्मरण रहावे यासाठी मनसेचे नाव असलेले दगड पेपरवेट म्हणून दिले. जर या विषयावर दुर्लक्ष झाले तर हेच दगड कुठे वापरायचे ते मनसैनिकाना



चांगलंच माहिती आहे असा इशारा दिला. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने शहरातील बँकांना सर्व व्यवहार मराठीत असणे अनिवार्य अशा विषयाचे निवेदन देवून व्यवहार मराठीतूनच करा तसेच बँकेच्या स्लिपवर देखील मराठी भाषा असूद्या अशी मागणी मनसेने केली.

निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्र शासनाने आणि राज ठाकरे यांच्या आदेशानुसार प्राधान्याने मराठी भाषेचा वापर करण्यात यावा. आपल्या आस्थापनेत मराठी भाषिकांना नोकरीत समावेश करण्याबाबत प्राधान्य द्यावे. तसेच दैनंदिन कार्यालयीन कामकाज, व्यवहार मराठी भाषेतच करावा. कोणत्याही अधिकाऱ्याकडून किंवा कर्मचाऱ्याकडून मराठी भाषेचा अवमान होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. आपण संपूर्ण सहकार्य कराल ही अपेक्षा. अशा आशयाचे पत्र कॅनरा बँक, कोटक बँक, युनियन बँक, बँक ऑफ बडोदा, स्टेट बँक ऑफ इंडिया आदि बँकांच्या शाखा व्यवस्थापकांना दिले आहे.

यावेळी मनसेचे माजी आमदार, प्रदेश सरचिटणीस तथा शहर अध्यक्ष प्रकाश भोईर, जिल्हाध्यक्ष उल्हास भोईर, मनसे महिला सेना प्रदेश उपाध्यक्षा उर्मिला तांबे, महिला शहर अध्यक्षा कस्तुरी देसाई, चेतना रामचंद्रन, विनोद केणे, गणेश चौधरी, सचिन पोपलाईतकर, संदीप नावगे, संतोष अमृते, कैलास पनवेलकर, संदीप पंडित, राजन शितोळे, रोहन आक्केवार आदी मनसैनिक उपस्थित होते.

# भिवंडी येथील लुम कामगाराचा मुलगा पहिल्याच प्रयत्नात झाला न्यायाधीश

दैनिक जीवनदीप वार्ता

हलाखीच्या परिस्थितीशी दोन हात करत, जिद्द आणि मेहनतीच्या बळावर एका लुम कामगाराच्या मुलाने *पहिल्याच प्रयत्नात महाराष्ट्रातून 41 वा क्रमांक मिळवून न्यायाधीश होण्याचा मान मिळवला आहे.*

लहानपणापासूनच संघर्ष हेच जणू त्याच्या आयुष्याचे सूत्र होते. घरची गरिबी, आई-वडिलांचे कष्टमय जीवन आणि शिक्षणाच्या वाटेतील अडथळे यांना न जुमानता त्यांनी आपले स्वप्न प्रत्यक्षात साकार केले.

घरच्या जबाबदाऱ्या, कोर्टातील प्रॅक्टिस आणि अभ्यास यांचा समतोल राखत त्याने दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग-2022 परीक्षेची तयारी करून अपार मेहनतीच्या जोरावर त्यांनी हा यशाचा टप्पा गाठला.

परिस्थिती कितीही कठीण असली तरीही *ध्येयाशी प्रामाणिक राहून, सातत्य आणि कठोर परिश्रमाने यश मिळवता येते, हे त्यांनी आपल्या उदाहरणाने सिद्ध केले आहे. **हा विजय केवळ त्यांचा नाही, तर जिद्दीवर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येक संघर्ष करणाऱ्या युवकाचा आहे!

# मिरा भाईदर महानगरपालिकेची पाणीपट्टी कर आकारणी विक्रमी पातळीवर

## पाणीपुरवठा व मल:निसारण विभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांचे तसेच जनजागृती उपक्रमाचे आयुक्त तथा प्रशासक यांनी केले विशेष कौतुक



दैनिक जीवनदीप वार्ता

भिवंडी : मिरा भाईंदर महानगरपालिकेने पाणीपट्टी कर वसुली करण्यात विक्रमी कामगिरी केली असून, दिनांक ३१ मार्च २०२४ रोजी मध्यरात्रीपर्यंत एकूण ११०७.७७ कोटीची कर आकारणी करण्यात आली आहे. मागील वर्षाच्या तुलनेत यंदा तब्बल १२४.११ कोटी जास्त कर गोळा करण्यात आला आहे. नागरिकांमध्ये कराचे महत्व पटवून देण्याच्या सातत्यपूर्ण जनजागृती मोहिमा आणि मनपा अधिकाऱ्यांच्या अथक प्रयत्नांमुळे हो यशस्वी कर वसुली साध्य झाली आहे. या पाणीपट्टी कर गोळा करण्याच्या प्रक्रियेत कर विभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी मोलाची कामगिरी केली, यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक राधाविनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांनी दिनांक ०४ एप्रिल २०२५ रोजी अधिकारी आणि कर्मचारी यांचा सत्कार केला.

मिरा-भाईंदर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागामार्फत प्रती वर्षी पाणीपट्टो वसुलीकरीता विशेष मोहिम राबविण्यात येते. सन २०२४-२०२५ यावर्षात देखिल आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली व शहर अभियंता आणि कार्यकारी अभियंता यांच्या नियंत्रणाखाली सदर मोहिमेअंतर्गत विभागातील शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता, लिपिक, मेस्त्री व मिटर रिडर यांची नेमणूक करण्यात आलेली होती. सदर पथक थकबाकीदारकांची यादी तयार करुन प्रत्यक्ष थकबाकीधारकांना भेटी देणे, थकबाकीधारकांना नोटीस बजावणे, थकीत रकमेचा भरणा करणेकरीता प्रवृत्त करणे, चेक रिर्टन वसुली करणे व थकबाकीधारकांच्या नळजोडण्या खंडीत करणे इत्यादी प्रकारची कार्यवाही करण्यात आली.

नागरीकांमध्ये पाणीपट्टी भरणा जलद होणेसाठी जनजागृती करणेकरीता ऑटोरिक्षा यांच्यावर ध्वनिक्षेपकाव्दारे जाहिर सुचना प्रसिद्ध करण्यात आल्या, तसेच प्रत्यक्ष पाणीपट्टी थकबाकीधारकांच्या घरोघरी भेट देऊन थकीत पाणीपट्टी रकमेचा भरणा करणेकरीता प्रवृत्त करण्यात आले. महानगरपालिकेमार्फत नागरीकांना पाणीपट्टी भरणे सोयीचे होणेकरीता महानगरपालिकापालिकेच्या संकेतस्थळावर ऑनलाईन तसेच मोवाईलव्दारे देखिल MyMBMC या मोबाईल ॲपद्वारे तसेच POS मशीनव्दारे पाणीपट्टी भरण्याचो सुविधा देण्यात आली. तसेच, सर्व सार्वजनिक सुट्टी, शनिवार तसेच रविवार या दिवशी सर्व पाणीपट्टो भरणा केंद्र सकाळी १०.०० ते सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत सुरु ठेवण्यात आलेली होती. पाणी पुरवठा विभागातील सर्व कर्मचारी वर्ग यांनी सर्व सुट्टीच्या दिवशी देखिल पाणीपट्टी वसुलीकरीता प्रयत्न केले. पाणी पुरवठा व मलनिसारण विभागाने ३१ मार्च २०२५ अखेर एकूण ११०७.७७ कोटी अर्थात ९८. ५५% पाणीपट्टी वसुलो करण्यात आलेली आहे. पाणी पुरवठा विभागातील कर्मचा-यांच्या अथक प्रयत्नामुळे हो विक्रमी वसुली करता आली, याकरीता विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मोलाच्या कामगिरी केल्याबद्दल महापालिका आयुक्त तथा प्रशासक राधाविनोद शर्मा (भा.प्र.से.) यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सत्कार सह विशेष कौतुकही केले.

# सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून आमदार विश्वनाथ भोईर यांचा वाढदिवस साजरा

दैनिक जीवनदीप वार्ता

कल्याण : विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करून कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघाचे आमदार विश्वनाथ भोईर यांनी आपला वाढदिवस साजरा केला. मात्र त्यातही कल्याणच्या वृद्धाश्रमातील आजी - आजोबांनी दिलेल्या अनोख्या प्रेमळ शुभेच्छांनी आमदार विश्वनाथ भोईर हे चांगलेच भारावून गेल्याचे दिसून आले.

कल्याण पश्चिमेचे आमदार विश्वनाथ भोईर यांच्या आजच्या वाढदिवसानिमित्त महाआरोग्य शिबिर, बुद्ध विहारांना आवश्यक वस्तूंची भेट, दिव्यांग मुलांच्या शाळेमध्ये अन्नदान, महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी छावा चित्रपटाचा मोफत शो यासह वृद्धाश्रमातील व्यक्तींना फळ वाटप अशा भरगच्च सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. ज्यामध्ये उंबर्डे येथे महाआरोग्य शिबीर, आधारवाडी येथील बुद्धविहारासाठी ध्वनिक्षेपक यंत्रणा तर बारावे येथील बुद्धविहारासाठी खुर्च्यांची भेट, होलीक्रॉस शाळेजवळील वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांना फळ वाटप, छाया टॉकीज परिसरातील सदिच्छा या



दिव्यांग मुलांच्या शाळेमध्ये विद्यार्थ्यांसाठी अन्नदान आणि केडीएमसी शाळेतील विद्यार्थ्यांसाठी छत्रपती संभाजी महाराजांच्या पराक्रमाची साक्ष देणाऱ्या छावा चित्रपटाचा मोफत शोचे आयोजन करण्यात आले होते. यातील शांतीधाम वृद्धाश्रमातील आजी आजोबांनी तर चक्क अतिशय सुरामध्ये "बार बार ये दीन आये, बार बार ये दिल गाये" या सुप्रसिद्ध हिंदी गाण्याच्या माध्यमातून आमदार विश्वनाथ भोईर यांना वाढदिवसाच्या प्रेमळ आशीर्वादरुपी शुभेच्छा दिल्या. ते पाहून आमदार विश्वनाथ भोईर यांच्यासह उपस्थित सर्वच जण अतिशय भारावून गेले होते.

वैयक्तीक कारणास्तव गेली 3 वर्षे आमदार भोईर यांनी आपला वाढदिवस साजरा केला नव्हता. मात्र यंदा विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या दणदणीत दिग्विजयाने कार्यकर्त्यांचा उत्साह शिगेला पोहोचला होता. त्यांच्या आग्रहास्तव आपण यावर्षी आपला वाढदिवस सामाजिकरीत्या साजरा करण्याचा निर्णय घेतल्याचे आमदार विश्वनाथ भोईर यांनी यावेळी सांगितले. तर येणारा आपला प्रत्येक वाढदिवस आपण शांती भवन वृद्धाश्रम आणि सदिच्छा दिव्यांग विद्यार्थ्यांच्या संस्थेसोबत साजरा करण्याचा निर्णय घेतल्याची प्रतिक्रिया त्यांनी प्रसिद्धी माध्यमांशी बोलताना दिली.

# मुलाला अटक केल्यामुळे भास्कर शेलार या कुंदे गावातील शेतकऱ्याने केली आत्महत्या

दैंनिक जीवनदीप वार्ता | टिटवाळा :

टिटवाळा पोलीस स्थानका अंतर्गत येणाऱ्या कुंदे गावातील भास्कर कृष्णा शेलार वय 55 याने काल रात्री जगलात जाऊन आत्महत्या केली आहे.

आपला मुलगा रवींद्र यास टिटवाळा पोलिसांनी अटक केल्यामुळे वडील भास्कर शेलार यांना प्रचंड तणाव आला होता. या तणावाखाली असतानाच त्यांनी काल रात्री एक च्या सुमारास घरातून बाहेर जाऊन जवळच्या जगलात गळ फास घेऊन आत्महत्या केली आहे.

या घटनेमुळे परिसरात उलट सुलट चर्चा सुरु आहेत. भास्कर शेलार अटक केलेल्या मुलास रवींद्र यास भेटून गेल्यानंतर प्रचंड मानसिक तणावात असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणने आहे. त्याच तणावात त्यांनी स्वतःला सम्पवलं की, मुलाला अटक केल्यामुळे जीवन संपवलं या बाबत ग्रामस्थ हळहळ वेक्त करत आहेत.

# आंबिवली स्टेशन नजीक झाड कोसळल्याने पाच दुचाकींचे नुकसान

दैनिक जीवनदीप वार्ता

कल्याण : आंबिवली स्टेशन नजीक रस्त्यावर झाड कोसळल्याची घटना शुक्रवारी संध्याकाळी घडली. सुदैवाने या घटनेत जिवितहानी टळली. पंरतु रस्त्यालगत उभ्या केलेल्या चार ते पाच दुचाकी चे नुकसान झाले. आज दुपारच्या सुमारास सोसाट्याचा वारा वाहू लागला. त्यामुळे धुळीचे साम्राज्य पसरले होते. या वाऱ्यामुळे आंबिवली येथे स्टेशन रोड वर असलेले



भले मोठे झाड उन्मळून पडले. झाडालगत उभ्या असलेल्या दुचाकींवर हे झाड कोसळल्याने चार ते पाच दुचाकींचे नुकसान झाले. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन विभागाने घटना स्थळी धाव घेत झाड बाजूला हटविले असल्याची माहिती केडीएमसी अग्निशमन दलाचे प्रमुख अग्निशमन आधिकारी नामदेव चौधरी यांनी दिली.

**सुदैवाने जिवित हानी टळली वादळी वाऱ्यामुळे भले मोठे झाड उन्मळून पडले**

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप
WhatsApp Channels
Follow, Unfollow, & Create Them
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैंनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई • नवी मंबई • ठाणे • रायगड • पालघर
मुख्य संपादक : रवींद्र नारायण घोडविंदे
कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम. डी.)
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.



# मैथिली शरण यांचे श्री रामकथा प्रवचन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : शहाड येथील विठ्ठल मंदिराच्या प्रांगणात ऋषिकेशहून आलेल्या स्वामी श्री मैथिली शरण यांचे ७ दिवसीय मानसिक प्रवचन आयोजित करण्यात आले होते. यावेळी ओ आर चितलांगे यांनी त्यांच्या पत्नीसह मैथिली शरण यांचे पुष्पहार अर्पण करून स्वागत केले. मैथिली शरण यांनी आपल्या प्रवचनात रामचरितमानसच्या घटनांचा आजच्या दैनंदिन घटनांशी संबंध जोडला आणि आपल्या जीवनात त्यांचे महत्त्व काय आहे हे उदाहरणांसह स्पष्ट केले. या कार्यक्रमात सेंच्युरीचे युनिट हेड रायन दिग्विजय पांडे, बिर्ला कॉलेजचे डॉ. नरेशचंद्र यांसहआसपासच्या भागातील अनेक रामभक्त उपस्थित होते.

# छत्रपती शिवाजी महाराज पुण्यतिथी कार्यक्रमाच्या नियोजनाचा मंत्री कु.तटकरे यांनी घेतला आढावा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : छत्रपती शिवाजी महाराजांच्या 345 व्या स्मृतिदिन कार्यक्रमास दि.12 एप्रिल रोजी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा रायगडावर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाच्या पूर्व तयारीचा आढावा महिला व बालविकास मंत्री कु. आदिती तटकरे यांनी आज महाड येथे आयोजित बैठकीत घेतला.

यावेळी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती नेहा भोसले, अप्पर पोलीस अधिक्षक श्री. अभिजीत शिवतरे, पुरातत्व विभागाचे अधिकारी श्री राजेश दिवेकर, स्थानिक उत्सव समितीचे अध्यक्ष श्री. रघुजीराजे आंग्रे, कार्यवाहक श्री. सुधीर थोरात, महाड नगरपरिषदेच्या माजी नगराध्यक्षा स्नेहल जगताप, श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळाचे सदस्य आणि विविध विभागाचे संबंधित अधिकारी आदी उपस्थित होते.

यावेळी महिला व बालविकास मंत्री कु तटकरे यांनी प्रशासन, पोलीस, पुरातत्व विभाग तसेच स्थानिक समित्या यांनी परस्पर समन्वयाने कार्यक्रमाचे दिमाखदार नियोजन करावे असे निर्देश दिले. एप्रिल महिन्या असलेल्या उन्हाची तीव्रता लक्षात घेऊन पुरेश्या प्रमाणात पिण्याचे पाणी, औषधे साठा ठेवावा. रायगड वर येणाऱ्या महिला व पुरुष यांच्यासाठी पुरेश्या प्रमाणात स्वछता गृह उपलब्ध करून द्यावे. गर्दी टाळण्यासाठी तसेच कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलीस प्रशासनाने खबरदारी घ्यावी. संबंधित यंत्रणांनी स्वच्छतेबाबत दक्षता घेण्यात यावी अशा सूचनाही त्यांनी यावेळी केल्या. तसेच प्रत्येक विभागाने आपल्याला दिलेली जबाबदारी यशस्विरित्या पार पाडावी असेही त्यांनी यावेळी सांगितले.

कार्यक्रमाच्या अनुषंगाने जिल्ह्यातील सर्व अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

# शिवचरित्र पारायण
## अनुभव आणि साठवण पुस्तकाचे प्रकाशन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



कल्याण : जिल्हा परिषद केंद्र शाळा राहनाळ येथे "शिवचरित्र पारायण: अनुभव आणि साठवण" या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा मोठ्या उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला. लेखक अजय पाटील यांनी आपल्या सहकारी शिक्षकांना सोबत घेऊन शाळेत राबवलेल्या शिवचरित्र पारायण उपक्रमातील अनुभव, आठवणी, विद्यार्थी सहभाग आणि समाजप्रबोधनाचा प्रवास या पुस्तकाच्या माध्यमातून मांडला आहे.

पुस्तकाचे प्रकाशन प्रसिद्ध साहित्यिक भिकू बारस्कर, प्रभारी सरपंच प्रताप पाटील, गटशिक्षणाधिकारी संजय अस्वले, माजी सभापती ललिता पाटील, माजी सरपंच डॉ. राजेंद्र भोईर, माजी उपसरपंच पंकज पाटील, ग्रामपंचायत सदस्य दिपक भोईर, मंगेश उबाळे, उमेश पाटील, किरण नाईक, शेखर फरमन, शिक्षक पतपेढी संचालक प्रशांत घागस आणि केंद्रप्रमुख शरद जाधव यांच्या हस्ते संपन्न झाला.

कार्यक्रमात प्रमुख पाहुण्यांनी आपल्या मनोगतातून लेखकाच्या कार्याचे आणि पुस्तकाचे कौतुक केले. साहित्यिक भिकू बारस्कर म्हणाले, "शिवचरित्र पारायण उपक्रम म्हणजे नव्या पिढीसाठी विचारांचा मार्गदर्शक आहे. अजय पाटील सरांनी केलेले लेखन अनुभवसंपन्न आणि भावनिक आहे. हे पुस्तक शिक्षण आणि संस्कार यांचा सुंदर मिलाफ आहे."

या पुस्तकासाठी ठाणे जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथ.) बाळासाहेब राक्षे, शिक्षणाधिकारी (योजना) भावना राजनोर, डाएट प्राचार्य डॉ. संजय वाघ तसेच इतर मान्यवरांनी शुभेच्छा संदेश दिला आहे. कार्यक्रमाचे उत्तम सूत्रसंचालन अंकुश ठाकरे यांनी केले तर रसिका पाटील यांनी आभार प्रदर्शन केले. पाहुण्यांचा प्रभारी सरपंच प्रताप पाटील यांच्या वतीने सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. पालक, ग्रामस्थ, शिक्षक व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीने हा कार्यक्रम प्रेरणादायी ठरला.

कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## - जाहिर सूचना -

ज्याअर्थी कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात मौजे-डोंबिवली, पश्चिम विभागातील प्रभाग क. ६४ कोपर क्रॉस रोड ते डॉ. नेमाडे गल्ली जुनी डोंबिवली हा रस्ता सन १९९८ साली मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम २१० अन्वये ९.०० मी. विद्यमान रस्ता असुन सदर रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१० अन्वये १२.०० मी. रुंद प्रस्तावीत आहे. सदर प्रस्तावीत १२.०० मी. संद रस्त्याची आखणी सर्वेक्षण नकाशावर A to B अशी दर्शविलेली आहे.

सदर विद्यमान रस्ता व याबाजूस असलेले रहिवास क्षेत्र तसेच अस्तित्वातील विद्यमान बांधकामे यांचे भविष्यातील पुर्नवसन व त्याअनुषंगाने या भागातील रहदारीचे सुनियोजनाच्या अनुषंगाने भविष्यात सदर रस्ता १२.०० मी. रुंदीकरण करणे गरजेचे आहे. सद्यस्थितीत यामध्ये काही प्रमाणात बाधित बांधकामे आहेत तथापी भविष्यातील गरज लक्षात घेता व या इमारतीचे पुर्नविकास परवानगी देताना १२.०० मी. रुंद याप्रमाणे रस्त्याची रुपरेषा निश्चित करुन बांधकाम प्रस्ताव विचारात येणे उचित होईल, तरी याकरीता जनहितार्थ भविष्यातील निकड विचारात घेता सदर रस्त्याची रुपरेषा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१० अन्वये १२.०० मी. निश्चित करणेकामी मा. आयुक्त महोदया यांनी दिनांक १७/३/२०२५ रोजी मान्यता दिली आहे.

त्याअर्थी या जाहिर सुचनेव्दारे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१० मधील तरतुदीनुसार सदर परीसरातील तसेच कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीतील सर्व नागरीकांना या जाहिर सुचनेव्दारे कळविण्यात येते की, उक्त प्रस्तावीत १२.०० मी. रुंद रस्ता महानगरपालिकेच्या नगररचना विभागातील सर्वेक्षण केलेल्या नकाशाप्रमाणे निहित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ ये कलम २१० प्रमाणे कोणीही वरील प्रमाणे विहित केलेल्या सदर रस्त्याच्या रेषेत कोणत्याही प्रकारचे बांधकाम करू शकणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

१) नोटीस प्रसिध्द झालेल्या दिनांका पासुन एक महिन्याच्या मुदतीत आपल्या सुचना व हरकती असल्यास कल्याण डोंबिवली महानगरपालिका द्वारा सचिव, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण यांचेकडे लेखी स्वरूपात दयाव्यात.

२) सदर नोटीस व नकाशाची प्रत नागरिकांच्या माहितीसाठी नगररचना विभाग मुख्यालय नोटीस बोर्डवर व "७/ह प्रभाग क्षेत्र" कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावण्यात आली आहे.

सही /-
(संतोष डोईफोडे)
सहाय्यक संचालक नगररचना
कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

जा.क्र.कडोंमपा/जसंवि/मुका/१९
दि.०४/०४/२५

# पीएम इंटर्नशिप योजनेच्या माध्यमातून युवक युवतींना रोजगाराच्या संधी उपलब्ध

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शासनाच्या पीएम इंटर्नशिप योजनेच्या माध्यमातून देशातील उच्च ५०० कंपन्यांमध्ये एक कोटी युवक/युवतींना इंटर्नशिपच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सदर योजनेचा लाभ भिवंडी निजामपुर शहरातील जास्तीत जास्त युवा / युवतींनी घेऊन रोजगाराच्या दिशेने पाऊल टाकावे, असे आवाहन भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचे मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अनमोल सागर यांनी केले आहे.

पी एम इंटर्नशिप योजना:

योजनेसाठी लाभार्थ्यांचे वय २१ ते २४ मध्ये असणे आवश्यक आहे.

लाभार्थी १० वी, १२ वी, ITI, पदवीधर इत्यादी शैक्षणिक पात्रता धारण केलेला असावा.

* इंटर्नशिप कालावधी हा १२ महिन्याचा असेल.इंटर्नशिपच्या कालावधीमध्ये प्रती रु. ५,०००/- एवढे मानधन देय असेल, तसेच एक रक्कम लाभ रु. ६,०००/- व विमा सुविधा उपलब्ध असेल. सदरील रक्कम शासन स्तरावरून दिली जाणार आहेत.

* लाभार्थी युवक/युवतीने स्वतः https://pminternship.mca.gov.in/login/या website वर जाऊन आपली दि. १५ एप्रील २०२५ पुर्वी नोंदणी करावी.

* नोंदणी करून आवश्यक कागदपत्रे अपलोड करावीत.

यासाठी लागणारी आवश्यक माहिती वरील वेबसाईट वर देण्यात आली आहे. किंवा आपल्या महानगरपालिका कार्यालयामध्ये दीअंयो राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, नविन प्रशासकीय इमारत ६ वा मजला, ६०५, जकातनाका, भिवंडी (NULM) कक्षाशी संपर्क साधावा.

सदर योजनेमध्ये बेरोजगार युवा युवती, बचत गट लाभार्थी, कचरा वेचक, गीग कामगार (website आधारीत सेवा पुरवीणारे), बांधकाम कामगार मजूर यांना सुद्धा नोंदणी करता येऊ शकेल, अशी माहिती श्री. अनमोल सागर, मा. प्रशासक तथा आयुक्त, यांनी दिली.

# आरोग्य विभागातील ७ आरोग्य सहाय्यकांना आरोग्य सेवक या पदोन्नतीचा लाभ

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



ठाणे : जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभाग अंतर्गत आरोग्य सेवक (पुरुष) या पदावरील ७ कर्मचारी यांना मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या हस्ते आरोग्य सहायक (पुरुष) या पदाचे पदोन्नती आदेश आज, दि. ४ एप्रिल, २०२४ रोजी देण्यात आले. जिल्हा परिषदेच्या मुख्यालयातील सभागृहात पदोन्नती आदेश देताना कर्मचाऱ्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

आरोग्य सहाय्यक पुरुष यांचे रिक्त पदांवर आरोग्य सेवक पुरुष संवर्गाच्या सेवा ज्येष्ठता यादीच्या अनुषंगाने ०७ आरोग्य सहाय्यक यांना पदोन्नती देण्यात आली. आरोग्य सहाय्यकांपैकी दोन दिव्यांग कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात आलेली आहे. यावेळी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.) अविनाश फडतरे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, सहाय्यक प्रशासन अधिकारी तसेच आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी आदी उपस्थित होते. आरोग्य कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष मनोहर देवरे यांनी सर्व यंत्रणेचे यावेळी आभार मानले.

# शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या कल्याण ग्रामीण शहरप्रमुखपदी अमित कोळेकर यांची निवड

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



कल्याण : शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या कल्याण ग्रामीण शहरप्रमुख पदी अमित कोळेकर यांची निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच कल्याण लोकसभा मतदारसंघांचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या आदेशानुसार, कक्षप्रमुख उपमुख्यमंत्र्यांचे विशेष कार्य अधिकारी मंगेश चिवटे यांच्या मार्गदर्शनाने ही निवड करण्यात आली.

त्यांना कार्याध्यक्ष राम राऊत यांनी निवडीचे पत्र सुपूर्द केले. काही दिवसांपूर्वी अमित कोळेकर यांनी असंख्य कार्यकर्त्यांसह शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला होता, त्यांना पक्षाने मोठी जबाबदारी देऊन प्रामाणिक काम कारणाऱ्या कार्यकर्त्याचा हा गौरव आहे असे जनमाणसात बोलले जात आहे. अमित कोळेकर यांच्या राजकीय व सामाजिक कारकिर्दीला यामुळे ताकद मिळणार आहे.

# राणी देशमुखच्या फसवणुकीचे लोन ग्रामिण भागापर्यंत!
## बेकायदेशीर भिश्या व व्याजी पैंसे देणाऱ्यावर टाच आणण्याची गरज....

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : गेले अनेक दिवस मुरबाड मध्ये शेकडो महिलांना कोटी रुपयांचा आर्थिक गंडा घालणाऱ्या जयश्री उर्फ राणी जनार्दन देशमुख यांनी मुरबाड शहरातील महिलांची फसवणूक तर केलीच पण ग्रामीण भागातील अनेक महिलाही जास्त व्याजाच्या अमिषाला बळी पडल्या आहेत. मोल मजुरी ,कष्ट करून आयुष्य भराची पुंजी करून दागिने बनवले होते.याच दागिन्यांवर राणी देशमुख व तिच्या साथिदारांनी डल्ला मारला असून आज त्या सोन्याच्या दागिन्यांना मुकल्या असून त्यांच्यावर पश्चाताप करण्याची वेळ आली आहे.घरी दागिने ठेवण्यापेक्षा मला द्या मी तुम्हांला जास्त व्याज देईन या अमिषाला महिला बळी पडल्या आहेत. फसवणूक झालेल्या या गरिब महिलांचे गेलेले दागिने कसे मिळणार हा प्रश्न उभा राहिला असून मुरबाड पोलिसांच्या तपास यंत्रणेवर अवलंबून आहे. मुरबाड पोलीसांनी फसवणूक झालेल्या या सर्व महिलांना न्याय द्यावा अशी मागणी सर्वत्र होत आहे. दरम्यान मुरबाड शहर व ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर भिश्या व व्याजी पेसै देण्याचे प्रकार सुरु असून पोलीसांनी या बेकायदेशीर धंद्यावर टाच आणावी व यातून सामान्य लोकांची होणारी आर्थिक फसवणूक टाळावी अशी मागणी सध्या जोर धरू लागली आहे.

> **महिलांच्या आर्थिक फसवणूकीतील महिला आरोपीला न्यायालयाने पोलीस कस्टडी दिली असून मुरबाड पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.**
> **- संदिप गिते,वरिष्ठ पोलिस निरीक्षक मुरबाड**

# ज्येष्ठ अभिनेते आणि दिग्दर्शक मनोज कुमार यांचे निधन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ज्येष्ठ भारतीय अभिनेते आणि चित्रपट दिग्दर्शक मनोज कुमार यांचे शुक्रवारी (4 एप्रिल) सकाळी निधन झाले. ते ८७ वर्षांचे होते. त्यांच्या निधनाने भारतीय चित्रपटसृष्टीतील एका युगाचा अंत झाला आहे. मनोज कुमार हे त्यांच्या देशभक्तीपर चित्रपटांसाठी ओळखले जातात. ते 'भारत कुमार' या नावाने प्रसिद्ध होते. कोकिलाबेन धीरूभाई अंबानी रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाची बातमी समजताच देशभरात शोककळा पसरली आहे.

### मनोज कुमार यांचा अल्पपरिचय

मनोज कुमार यांचे खरे नाव हरिकिशन गिरी गोस्वामी असे होते. चित्रपटसृष्टीच्या प्रेमासाठी त्यांनी आपल्या नावात बदल केला होता. पण त्यांना खरी ओळख 'भारत कुमार' या नावाने मिळाली. मनोज कुमार यांचा जन्म २४ जुलै १९३७ रोजी एबटाबाद (आता पाकिस्तानमध्ये) या ठिकाणी झाला. हरिकिशन गिरी गोस्वामी यांचे कुटुंब फाळणीनंतर भारतात आले आणि दिल्लीत स्थायिक झाले. मनोज कुमार यांनी फाळणीचे दुःख जवळून अनुभवले होते.



## 'सिनेसृष्टीतील सुवर्णयुग संपले..'
### PM मोदींनी मनोज कुमार यांना वाहिली श्रद्धांजली

भारतीय चित्रपटसृष्टीतील दिग्गज अभिनेते आणि दिग्दर्शक मनोज कुमार यांच्या निधनाने संपूर्ण देशात शोककळा पसरली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मनोज कुमार यांच्या निधनावर शोक व्यक्त करत त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

पंतप्रधान मोदींनी आपल्या सोशल मीडिया पोस्टमध्ये लिहिले, "प्रसिद्ध अभिनेते आणि दिग्दर्शक श्री मनोज यांच्या निधनाची बातमी अत्यंत दुःखद आहे. भारतीय सिनेसृष्टीतील एक महान व्यक्तिमत्त्व म्हणून ते ओळखले जात होते. विशेषत त्यांच्या चित्रपटांमधून प्रकट होणाऱ्या देशभक्तीमुळे त्यांची एक वेगळी छाप होती. त्यांच्या कलाकृतींनी जनमानसात राष्ट्रीय अभिमान चेतवला आणि पुढील अनेक पिढ्यांना प्रेरित करत राहतील. त्यांच्या जाण्याने सिनेसृष्टीतील एक सुवर्णयुग संपले आहे. या दुखद क्षणी त्यांचे कुटुंबीय आणि चाहत्यांसोबत माझ्या संवेदना आहेत. ओम शांती."

मनोज कुमार यांनी 'पूरब और पश्चिम', 'क्रांती', 'शहीद' आणि 'उपकार' यांसारख्या अनेक देशभक्तीपर चित्रपटांमधून भारतीय जनतेच्या मनात विशेष स्थान निर्माण केले होते. त्यांच्या चित्रपटांमध्ये राष्ट्रीय भावना आणि सामाजिक संदेश ठळकपणे दिसून यायचे. त्यांच्या योगदानाची दखल घेत भारत सरकारने त्यांना पद्मश्री आणि दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित केले होते. मनोज कुमार यांच्या निधनाने भारतीय चित्रपटसृष्टीत एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे. अनेक दिग्गज कलाकार, राजकीय नेते आणि चाहत्यांनी त्यांच्या आठवणींना उजाळा देत श्रद्धांजली वाहिली.




'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 Postal Registration No. THC/256/2022-2024